# मुंबई विद्यापीठ

विद्याविषयक नियोजन
आणि विकास विभाग
क्र. वि. नि. वि. वि./४१८/१७२/२०१८
१९जुन, २०१८

प्रति,
सर्व विभाग प्रमुख
मुंबई विद्यापीठ,

विषय :– महाराष्ट्र अध्ययन केंद्राबाबत...

महोदय/महोदया

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठ प्रशासनाने महाराष्ट्र अध्ययन केंद्र सुरू करण्याकरिता अध्ययन केंद्राचे स्वरूप तसेच केंद्राने हाती घ्यावयाचे विविध उपक्रम निर्धारीत करण्याकरिता डॉ. एम.एस. कुऱ्हाडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची बैठक सोमवार दि. ११ जून २०१८ रोजी दुपारी १२.३० वा. फोर्ट परिसरात संपन्न झाली. सदर समितीला आपल्या विभागामार्फत गेल्या दोन वर्षात मराठी भाषा, मराठी बोली, मराठी इतिहास, लोककला, मराठी संस्कृती विषयी आयोजित केलेल्या विविध उपक्रमांची माहिती, व्याख्याने, चर्चासत्र, संमेलने, मराठी मधील पुस्तक प्रकाशन, तसेच इतर भाषांमधून मराठी भाषेत भाषांतर झालेले साहित्य इत्यादीयांची सविस्तर माहिती कळविण्यात यावी. विभागाच्या वतीने महाराष्ट्र आणि महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही पैलू विषयी घेतलेल्या उपक्रमाची नोंद पाठवावी.

आपणांस विनंती करण्यात येते की, उपरोक्त माहिती पंधरा दिवसात कळविण्यात यावी.

धन्यवाद !

आपली विश्वासू,

SKSawant

(संजना सावंत)
सहायक कुलसचिव
(विद्याविषयक नियोजन व विकास विभाग)